**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
मु.पो.शिर्डी-४२३१०९ ता.राहाता, जिल्हा- अहिल्यानगर (महाराष्ट्र)
Email-saiprasadalaya@sai.org.in, फोन नं.

सन २०२६-२७ करीता श्री साई प्रसादालयातील उष्टे अन्नपदार्थ / भाजीपाल्याचे वेस्टेज उच्चतम दराने घेऊन जाणेकामी बंद पाकीटात निविदा मागणी मागविणेत येत असुन निविदा सादर करण्याची अंतीम दि. २०/०६/२०२६ ही राहील. तरी इच्छुक निवीदाधारकांनी श्री साईबाबा संस्थानचे अधिकृत www.sai.org.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## नियम व अटीचा तपशिल

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
मु.पो.शिर्डी-४२३१०९ ता.राहाता, जिल्हा- अहिल्यानगर (महाराष्ट्र)
फोन नं.(०२४२३)२५८८४४,२५८८५५

### निविदा सुचना.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे खालील कामाकरीता बंद पाकिटात निविदा मागविणेत येत आहे.

| अ.नं. | निविदेचा तपशिल |
|---|---|
| ०१. | श्री साई प्रसादालयातील निघणारे वेस्टेज अन्नपदार्थ, भाजीपाल्याचे वेस्टेज पशु/पक्षांना खाद्य म्हणुन देणेकामी. |

१. निविदेचा कालावधी जूलै २०२६ ते जुन २०२७ असा एक वर्षाकरीता राहील.

२. निविदा / दरपत्रकधारकाने दरपत्रकावर आपले संपुर्ण नांव, पत्ता व दूरध्वनी / मोबाईल क्र. नमूद करावा. निविदेवर “श्री साई प्रसादालय वेस्टेज अन्नपदार्थ, भाजीपाल्याचे वेस्टेज निविदा” असा उल्लेख करावा.

३. दरपत्रक धारकाने वेस्टेज अन्नपदार्थ घेणेसाठी उच्चतम दर व क्षमता नमुद करावी. वेस्टेज देणेबाबत कोणतीही चर्चा / वाटाघाटी होणार नाही. एक अथवा त्यापेक्षा जादा व्यक्तींना वेस्टेज देणे याबाबत संस्थान निर्णय घेईल.

४. वेस्टेज अन्नपदार्थ दररोज दोन वेळेस (दुपारी ०२ ते ०३ चे दरम्यान व रात्रौ.०९ ते १० चे दरम्यान) घेऊन जायचे आहे व त्याच दिवशी त्याचा वापर करावयाचा आहे. ते दुसरे दिवशी पशु/ पक्षांना घालू नये. तसे केल्यास व त्यामुळे काही घटना घडल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही. त्यांची संपुर्णत: जबाबदारी संबंधीत निविदाधारकाची राहील. याबाबतचे संबंधीताकडून प्रतिज्ञापत्र लिहून घेण्यात येईल.

५. निविदाधारक यांची निविदा मंजूर झालेनंतर स्वत: वेस्टेज उचलावयाचे आहे. एक किंवा अनेक उपठेकेदाराची नेमणूक करता येणार नाही, वेस्टेज पदार्थांचा वापर ज्या-त्या दिवशी करावयाचा आहे तसेच वेस्टेज पदार्थांची वाहतूक व साठवणूक करतांना इतर कोणालाही त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

६. ज्या निवीदाधारकांची निविदा मंजूर होईल, अशा निविदाधारकास वेस्टेज अन्नपदार्थ उचलणेची हमी म्हणून रु.१०,०००/- (अक्षरी रु. दहा हजार मात्र) संस्थानकडे सुरक्षा अनामत म्हणून जमा करावी लागेल. सदर रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही. सदर रक्कम निविदा कालावधी संपलेनंतर परत करणेत येईल.

७. निवीदाधारकाने रोजचे रोज वेस्टेज न नेल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता निविदा रद्द करुन करणेत येऊन, संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत येईल. त्याबाबत कोणतीही तक्रार करण्याचा अधिकार निवीदाधारकास राहणार नाही.

८. निविदाधारकाने बंद पाकीटातील निविदा दि.१०/०६/२०२६ पासुन दि.२०/०६/२०२६ अखेर सायं.०५.०० वाजेपर्यंत संस्थानचे आवक विभागात जमा करावी. उशिरा आलेले निवीदांचा विचार केला जाणार नाही.

९. वेस्टेज अन्नपदार्थ विक्रीची निवीदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार संस्थानने राखून ठेवला आहे.

१०. वेस्टेज अन्नपदार्थ विक्री संदर्भात काही वाद उत्पन्न झाल्यास तो राहाता येथील न्यायकक्षेच्या अंतर्गत राहील.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी